# प्रेसनोट दि. १०/०६/२०१९

दि. ०२/०६/२०१९ ते ०८/०६/२०१९ या आठवडा कालावधीतील सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील प्राप्त तक्रारी अर्जातील डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम रुपये १,०३,१७५/- अर्जदार यांना रिफंड करण्यात आली.

सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे तक्रारी अर्जापैकी डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम जर माहिती (ओटीपी) शेअर केला गेला असेल तर बँकेकडून सदर रक्कम रिफंड केली जात नाही. अशा प्रकारच्या अर्जामध्ये पैसे विविध मर्चंट / वॉलेट पैसे गेले असतात सायबर सेल, संबंधित मर्चंट / वॉलेट यांना मेलद्धारे पत्रव्यवहार करुन अर्जदार यांना त्याची रक्कम रिफंड करुन दिली जाते.

दुस-या प्रकारात ओटीपी शेअर केला नसेल किंवा अर्जदार यांचे डेबीट / क्रेडीट कार्ड त्याच्या ताब्यात असताना सुध्दा त्याच्या खात्यावरील रक्कम काढली जाते अशावेळी सायबर क्राईम पोलीस स्टेशन मार्फत त्याची रक्कम परत मिळवुन देण्यासाठी आणि पुढील अर्ज चौकशीसाठी मेलद्धारे सदर बँकला पत्रव्यवहार केला जातो. अशा वेळी ठराविक दिवसानंतर अर्जदार यांची रक्कम संबंधित बँकेमार्फत किंवा मर्चंट/वॉलेट द्वारे अर्जदार यांचे अकाउंटला परत केली जाते. अशाप्रकारे एका अर्जात अर्जदार नरसण्णागरी रमेश यांचे डेबीट कार्ड त्याचे जवळ असताना त्याच्या खात्यावरुन परदेशात अनधिकृत होवुन व्यवहार होवुन त्यांची ९३,१७५/- रुपयाची फसवणुक झाली होती. सदर बाबत सिटी बँकेशी पत्रव्यवहार करुन त्याची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. दुस-या अर्जात अर्जदार अभिषेक कुमार यांच्या डेबीट कार्ड त्यांनी कोणतीही माहिती शेअर न करता अनधिकृत व्यवहार होवुन त्याची आर्थिक फसवणुक झाली होती. सदर बाबत तात्काळ पेटीएम या मर्चंटशी पत्रव्यवहार करुन १०,०००/- रुपये रक्कम रिफंड करण्यात आली. सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त निलेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर मधील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

पोलीस उप-आयुक्त
आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर